**सोलापूर विद्यापीठ**
**परीक्षा व मूल्यमापन विभाग**
सोलापूर पुणे राष्ट्रीय महामार्ग, केगाव,
सोलापूर - ४१३ २५५
ईपीएबीक्स - ०२१७ -२७४४७६०/६१/६३/६६/७१/७२/७३ /७४/७८/७९
फॅक्स नं. - ०२१७-२७४४७७०
संकेतस्थळ: http://su.digitaluniversity.ac/www.sus.ac.in
ई-मेल: coe@sus.ac.in

सोलापूर विद्यापीठ
॥ विद्यया संपन्नता ॥
NAAC Accredited-2015
'B' Grade (CGPA 2.62)

**Solapur University**
**Examinations and Evaluation Section**
Solapur-Pune National Highway, Kegaon,
Solapur-413 255
EPABX No.0217- 2744760/61/63/66/71/72/73/74/74/79
Fax No.0217-2744770
Web Site http://su.digitaluniversity.ac/www.sus.ac.in
email id: coe@sus.ac.in

सोविसो/परीक्षा /२०१८/ 2033

दिनांक : 24 AUG 2018

प्रति,
**मा.प्राचार्य/संचालक,**
सर्व संलग्नीत महाविद्यालये/परिसंस्था,
**सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.**

**विषय** : पर्यावरणशास्त्र विषयाच्या निकालाबाबत.

**महोदय,**

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की प्रस्तुत विद्यापीठाच्या पदवी वर्गांच्या द्वितीय वर्षाच्या अभ्यासक्रमामध्ये पर्यावरणशास्त्र या विषयाचा समावेश करण्यात आलेला आहे. या विषयाचे गुण इतर विषयांसोबत एकत्रीत केले जात नाहीत तसेच हे गुण श्रेणीसाठी, टक्केवारीसाठीही गृहीत धरले जात नाहीत. विद्यार्थी पर्यावरणशास्त्र हा विषय उत्तीर्ण नसला तरीही इतर विषयामध्ये उत्तीर्ण असल्यास विद्यार्थ्यांच्या गुणतक्त्यावर उत्तीर्ण असे दर्शविले जाते. मात्र या विषयामध्ये उत्तीर्ण असल्याशिवाय विद्यार्थी पदवी प्रमाणपत्रासाठी पात्र ठरत नाही. कांही विद्यार्थी पदवी पूर्ण झाल्यानंतर लगेचच पदवी प्रमाणपत्रासाठी अर्ज करतात व पदवी प्राप्त करतात. मात्र कांही विद्यार्थी चार पाच वर्षानंतर पदवी प्रमाणपत्रासाठी अर्ज करतात त्यावेळी पडताळणी करतांना पर्यावरणशास्त्र या विषयामध्ये अनुत्तीर्ण असल्याचे निदर्शनास येते व सदरील विद्यार्थी पदवी साठी पात्र ठरत नाही.

सबब या पत्राद्वारे कळविण्यात येते की, आपल्या महाविद्यालयातील कांही विद्यार्थी (शै.वर्ष २००५-६ पासून) पर्यावरणशास्त्र या विषयामध्ये अनुत्तीर्ण असतील तर त्यांची माहिती त्वरीत विद्यापीठास कळवावी. तसेच संबधीतांना पदवी प्रमाणपत्र घेण्याबाबत आपल्या स्तरावरुन कळवावे.

कळावे,

आपला विश्वासू,
24/8/18
संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ